स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प.),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. : व.वि.श.म./मा.तं./03/25-26**
**दिनांक : 01/04/2025**

# प्रेस नोट

**मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसाच्या कृती आराखडयातील ७ कलमी उपक्रमा अंतर्गत वसई-विरार क्षेत्रातील दिव्यांग नागरिकांना महापालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ ऑनलाईन पद्धतनी मिळणेकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी ऑनलाई सुविधेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा - मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे आवाहन**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दिव्यांग कल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील दिव्यांगकरिता खालीलप्रमाणे विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे.

१) ४० % ते ५९ % अपंगत्व असलेल्या अंध,अस्थिव्यंग,बहुविकलांग,कर्णबधिर-मुकबधीर दिव्यांग व्यक्तींना मासिक रु.१०००/- अनुदान देणे.
२) ६० % ते ७९ % अपंगत्व असलेल्या अंध,अस्थिव्यंग,बहुविकलांग,कर्णबधिर-मुकबधीर दिव्यांग व्यक्तींना मासिक रु.१५००/- अनुदान देणे.
३) ८० % ते १०० % अपंगत्व असलेल्या अंध,अस्थिव्यंग,बहुविकलांग,कर्णबधिर-मुकबधीर दिव्यांग व्यक्तींना मासिक रु.२०००/- अनुदान देणे.
४) जेष्ठ ६० वर्षावरील दिव्यागांना कायमस्वरुपी प्रोत्साहनात्मक प्रतीमाह रु.२०००/- अनुदान देणे.
५) दिव्यागांना स्वयंरोजगारा करिता व्यवसायानुसार रु.५०,०००/- पर्यंत आधार योजना राबविणे.
६) दिव्यांग करिता १८ वर्षावरील गतीमंद व मतीमंद व्यक्तीच्या संगोपनाकरिता त्यांच्या कुटूंबाला प्रतीमाह रु.२०००/- अनुदान देणे.
७) दिव्यांग खेळाडुंसाठी तालुकास्तरीय रु.१०,०००/-, जिल्हास्तरीय रु.२५,०००/-, राज्यस्तरीय रु.५०,०००/-, आंतरराष्ट्रीय स्तरीय रु.१,००,००/- इतके प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.
८) दिव्यांग व्यक्तींना व्याधीग्रस्त आजार,शस्त्रक्रिया त्या अनुषंगीक आजारानुसार खर्चाच्या २५% अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे.

या सर्व योजनांची महानगरपालिकेच्या दिव्यांग कल्याण विभागामार्फत दैनंदिन अंमलबजावणी सुरू असून, याबाबतचे **ऑनलाईन अर्ज करण्यासाठी https://vvcmc.in/schemes-२/ या संकेतस्थळावर भेट द्यावे. तसेच खालील दिलेल्या QR code वर स्कॅन करुन देखील अर्ज करु शकता,** तरी सदर योजनेकरिता पात्र महानगरपालिका हद्दीतील लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी केले आहे.

**सही/-**
**उपायुक्त**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**